# <u>जिल्हा नागरी विकास यंत्रणा, नांदेड</u>

Chairman & Collector,
Dist. Urban Development Agency,
(DUDA), Collector Office Nanded

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा नागरी विकास यंत्रणा
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
नोंदणी क्र.स.नो.अ./1860/महा/412/98
दूरध्वनी-02462-2371101 फॅक्स-238500
क्र.2010/सुजयो/का-2/टे-2/प्र.क्र.
दिनांक : 12/4/2010

**निविदा सूचना :-**

शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.सुजयो-2010/प्र.क्र.02/न.वि.-16,मंत्रालय,मुंबई दि.25 जानेवारी 2010 अन्वये सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या प्रशिक्षण (STEP-UP) या घटकांतर्गत नांदेड जिल्हयातील नागरी भागातील दारिद्रय रेषेखालील पात्र लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी **प्रशिक्षणार्थ्यांची निवड करणे, मान्यताप्राप्त प्रशिक्षण संस्थांमार्फत प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे, प्रशिक्षणानंतर प्रशिक्षणार्थ्यांना स्वयंरोजगार किंवा रोजगार मिळवून देणे यासाठी जिल्हास्तरावर Nodal agency ची नियुक्ती करावयाची आहे.** त्यासाठी **संस्था अधिनियमानुसार नोंदणीकृत शासकीय/खाजगी संस्थांकडून** याव्दारे सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

**Nodal agency च्या पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे राहतील.**

1) शासकीय स्वायत्त/खाजगी संस्थांना नोडल यंत्रणा म्हणून या कार्यक्रमात सहभागी होता येईल.
2) निविदा भरणारी संस्था ही शासकीय/खाजगी संस्था असावी व संस्था अधिनियमानुसार नोंदणीकृत असावी. नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकीत केलेली छायाप्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील.
3) निविदा भरणारी संस्था ही किमान तीन वर्षापासून अस्तित्वात असावी.
4) निविदा भरणा-या संस्थेस किमान तीन वर्षाचा प्रशिक्षण/रोजगार/स्वयंरोगार या क्षेत्रातील अनुभव असावा. यापूर्वी प्रशिक्षण/रोजगार/स्वयंरोजगार या क्षेत्रात केलेल्या कामाचे पुरावे निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील.
5) निविदा भरणा-या संस्थेची वार्षिक उलाढाल किमान रु.15 लक्ष इतकी असावी. त्यासाठी आवश्यक पुरावे निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील.

**निविदा प्रक्रीयेव्दारे निवड करण्यात आलेल्या Nodal agency ची जबाबदारी/कार्ये/कर्तव्ये/अटी/शर्ती खालीलप्रमाणे राहतील.**

1) राज्यस्तरावर नेमण्यात येणा-या सर्वे अणि प्लेसमेंट एजन्सीला आवश्यकतेनुसार सर्वे करण्यासाठी सहकार्य करणे.
2) उद्योग क्षेत्रातील व समाजातील रोजगारासंबंधीची गरज लक्षात घेवून जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांना विविध प्रशिक्षण कार्यक्रम तयार करण्यास मदत करणे.
3) क्षेत्रीय पातळीवर (नांदेड जिल्हयातील मनपा/नगरपरिषद क्षेत्रातील) प्रत्यक्ष लाभार्थ्यांची निवड करणे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिका-यांच्या मदतीने निवड केलेल्या लाभार्थ्यांची आवड-निवड व बाजारातील वाव असलेल्या व्यवसायांचा विचार करुन प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण मान्यताप्राप्त (Accredited) संस्थांकडून (या कार्यालयाने निविदा प्रक्रीयेव्दारे निवड केलेल्या संस्थांकडून) आयोजित करण्याचे नियोजन करणे व त्यास जिल्हा नागरी विकास यंत्रणेच्या (DUDA) अध्यक्षांची मान्यता घेणे.
4) प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण व्यवस्थित होत आहे किंवा नाही ते पाहणे.
5) प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध होण्यसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे व याकामी सर्वे आणि प्लेसमेंट संस्थेच्या मार्गदर्शनाखाली काम करणे.
6) प्रशिक्षणार्थीसाठी भविष्यात उपलब्ध होणा-या निरनिराळया उद्योगांमधील रोजगाराच्या/स्वयंरोजगाराच्या संधी लाभार्थ्यांना मिळवून देणे.
7) योजनेंतर्गत प्रशिक्षणाबाबत शासनाने/या कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे.
8) **निविदा भरणा-या संस्थेने प्रती लाभार्थी देय मोबदला निविदेत नमूद करावा. नोडल यंत्रणेस प्रती लाभार्थी देय होणा-या रकमेपैकी 60 % प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर, 30 % प्रशिक्षणार्थीस रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध झाल्यानंतर तसेच उर्वरीत 10% रक्कम राज्यस्तरीय सर्वे व प्लेसमेंट एजन्सीला देय राहील.**
9) निवड करण्यात आलेल्या Nodal agency ला लाभार्थ्यांच्या प्रशिक्षणानंतरच्या रोजगार व स्वयंरोजगारासाठी जबाबदार धरण्यात येईल.

ईच्छुक शासकीय/खाजगी संस्थांनी **दि. 27-04-2010** रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत (शासकीय सुटीचे दिवस वगळून) जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे सिलबंद निविदा सादर कराव्यात. निविदा **दि. 27-04-2010** रोजी सायंकाळी 5.30 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे उपस्थित निविदाधारक/अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

निविदाचे कोरे फॉर्म **दि. 26-4-2010 पर्यंत** कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 ते सायंकाळी 17.45 वाजेपर्यंत रक्कम रु.100/- (अक्षरी रु. शंभर) डी.डी. व्दारा भरणा केल्यास मिळतील.

निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ आवश्यकतेनुसार बदलण्याबाबतचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

**स्वाक्षरीत**
**जिल्हाधिकारी नांदेड**